**मे. अल्ट्राटेक सिमेंट, धुळे यांच्या प्रस्तावित ३.० MTPA क्षमतेच्या सिमेंट ग्राईडिंग व आवेष्टन (स्टॅन्डअलोन क्लिंकर ग्रांडीग युनिट) उत्पादनाचा प्रकल्प प्लॉट नं. ३, म.औ.वि.मं., औद्योगिक क्षेत्र, नरडाणा, ता. शिंदखेडा, जि. धुळे या ठिकाणी प्रस्तावीत असुन या विषयी पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणी व्हिडियो कॉन्फरन्सिंगव्दारे जिल्हाधिकारी कार्यालयातून व प्रत्यक्ष उद्योग स्थळावर आज दि. २०/१०/२०२० रोजी सकाळी ११.०० वाजता घेण्यात आली. सदर झालेल्या पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणीचे इतिवृत्त.**

मे. अल्ट्राटेक सिमेंट, धुळे यांच्या प्रस्तावित ३.० MTPA क्षमतेच्या सिमेंट ग्राईडिंग व आवेष्टन (स्टॅन्डअलोन क्लिंकर ग्रांडीग युनिट) उत्पादनाचा प्रकल्प प्लॉट नं. ३, म.औ.वि.मं., औद्योगिक क्षेत्र, नरडाणा, ता. शिंदखेडा, जि. धुळे या ठिकाणी प्रस्तावीत असून सदर प्रकल्पाची पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणी व्हिडियो कॉन्फरन्सिंगव्दारे जिल्हाधिकारी कार्यालयातून व प्रत्यक्ष उद्योग स्थळावर आज दि. २०/१०/२०२० रोजी सकाळी ११.०० वाजता मा. श्री. संजय यादव (जिल्हाधिकारी तथा जिल्हा दंडाधिकारी, धुळे) यांच्या अध्यक्षतेखाली घेण्यात आली.

**सौ. सौजन्या सु. पाटील**, उप प्रादेशिक अधिकारी, म.प्र. नि.मंडळ, धुळे हया सदर लोकसुनावणीच्या संयोजक होत्या. श्री. अमर दुर्गले, प्रभारी प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि.मंडळ, नाशिक हे जनसुनावणी समितीचे सदस्य होते. पर्यावरण विषयक जाहिर लोकसुनावणी, समितीच्या मा.अध्यक्षांच्या अनुमतीने दुपारी ११.०० वाजता सदर लोक सुनावणी व्हिडियो कॉन्फरन्सिंगच्या माध्यमातुन सुरू झाली.

संयोजकांनी उपस्थितांचे स्वागत करून, वने व पर्यावरण मंत्रालय, नवी दिल्लीच्या दि. १४.०९.२००६ रोजीच्या अधिसुचना व सुधारीत अधिसुचना दि. १.१२.२००९ रोजीच्या अधिसुचनेमधील तरतुदींप्रमाणे सदरील जाहिर लोकसुनावणी घेण्यात येत असल्याचे नमुद केले. सदर प्रकल्प धारकास वने व पर्यावरण मंत्रालय, नवी दिल्ली यांच्यातर्फे प्रस्तावीत प्रकल्पाकरिता टर्म्स ऑफ रेफरन्स (TOR) दि. २९.०५.२०२० रोजी मिळाला व प्रकल्प धारकाने जाहिर लोकसुनावणी घेण्याबाबत मंडळाकडे दि. ०८.०९.२०२० रोजी अर्ज सादर केला.

प्रस्तावित प्रकल्पाच्या पर्यावरणीय आघात मुल्यांकन अहवाल (EIA Report) पर्यावरणीय व्यवस्थापन योजना (EMP) व कार्यकारी सारांशाच्या इंग्रजी व मराठीतील प्रती तसेच सदरील लोकसुनावणी बाबतच्या जाहीर सुचनेच्या प्रती खालील शासकीय कार्यालयामध्ये उपलब्ध करून देण्यात आल्या होत्या.

१. जिल्हाधिकारी कार्यालय, धुळे
२. जिल्हा परिषद, धुळे
३. जिल्हा उद्योग केंद्र धुळे
४. उपविभागीय कार्यालय, शिरपूर, धुळे
५. तहसिल कार्यालय शिंदखेडा जि. धुळे
६. नगर पंचायत कार्यालय, शिंदखेडा जि. धुळे
७. ग्रामपंचायत कार्यालय वाघोदे, नरडाणा, जातोडे, वारूड, मलाणे, तहसिल शिंदखेडा जि. धुळे
८. उप-प्रादेशिक कार्यालय, म.प्र.नि.मंडळ, धुळे
९. प्रादेशिक कार्यालय, म.प्र.नि.मंडळ, नाशिक
१०. संचालक (जल प्रदुषण नियंत्रण), महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ, मुख्यालय, मुंबई
११. पर्यावरण विभाग मंत्रालय, मुंबई
१२. प्रादेशिक कार्यालय, वने व पर्यावरण मंत्रालय, नागपूर

लोकसुनावणीसाठीची जाहीर सूचना दि. १८/०९/२०२० रोजीच्या इंग्रजी दैनिक "दि टाईम्स ऑफ इंडीया" व मराठी दैनिक "लोकमत" या वृत्तपत्रांमध्ये प्रकाशित केली होती. सदरील जाहिर सुचनेमध्ये प्रस्तावीत प्रकल्पाकरिता पर्यावरणविषयक जाहिर लोकसुनावणी दि.२०/१०/२०२० रोजी दुपारी ११.०० वा. व्हिडियो कॉन्फरन्सिंगव्दारे जिल्हाधिकारी कार्यालयातून व प्रत्यक्ष उद्योग स्थळावर आयोजित करण्याबाबत नमुद होते.

सौ. सौजन्या सु. पाटील, संयोजक तथा उप प्रादेशिक अधिकारी, म.प्र. नि.मंडळ, धुळे यांनी जाहीर लोकसुनावणीस उपस्थित सुनावणी समितीचे अध्यक्ष तसेच सर्व उपस्थित नागरीकांचे स्वागत केले. तसेच संयोजकाच्या विनंतीनुसार श्री. अमर दुर्गले, साहेब, सुनावणी समितीचे सदस्य तथा प्रभारी प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि. मंडळ, नाशिक यांनी श्री. संजय यादव, साहेब सुनावणी समितीचे अध्यक्ष तथा मा. जिल्हाधिकारी व जिल्हा दंडाधिकारी धुळे यांचे स्वागत केले.

सदर लोकसुनावणीचे अध्यक्ष तथा मा.जिल्हाधिकारी व जिल्हा दंडाधिकारी श्री. संजय यादव साहेब यांच्या परवानगीने व्हिडियो कॉन्फरन्सिंगच्या माध्यमातुन लोकसुनावणीस सुरवात करण्यात आली.

संयोजकांनी नमुद केले की मे. अल्ट्राटेक सिमेंट, धुळे यांच्या प्रस्तावित ३.० MTPA क्षमतेच्या सिमेंट ग्राईंडिंग व आवेष्टन (स्टॅन्डअलोन क्लिंकर ग्रांडीग युनिट) उत्पादनाचा प्रकल्प प्लॉट नं. ३, म.औ.वि.मं., औद्योगिक क्षेत्र, नरडाणा, ता. शिंदखेडा, जि. धुळे या ठिकाणी प्रस्तावीत असून सदर उत्पादनाबाबत टर्म्स ऑफ रेफरन्स (TOR) दि. २९/०५/२०२० रोजी या प्रकल्पास प्राप्त झाला. सदर प्रकल्पबाबत देण्यात आलेल्या पर्यावरणीय अहवालाचा मसुदा प्रदुषण नियंत्रण मंडळाकडे दि. ०८/०९/२०२० रोजी प्रकल्प प्रस्तावकाव्दारे अर्ज सादर करण्यात आला असून या प्रकल्पाची जाहीर लोकसुनावणी आयोजीत करण्यात आली आहे याबाबत जाहीर सुचना दि. १८.०९.२०२० रोजीच्यामराठी वृत्तपत्र दैनिक "लोकमत" व इंग्रजी वृत्तपत्र "दि टाईम्स ऑफ इंडीया" या वृत्तपत्रात प्रसिध्द करण्यात आली होती. त्यामध्ये या प्रकल्पाबाबत पर्यावरण विषयक सुचना, आक्षेप, टिका-टिप्पणी नोंदविण्याबाबत नियोजीत प्रकल्पाच्या जनतेस व पर्यावरण अभ्यासक यांना आवाहन करण्यात आले होते. यामध्ये पर्यावरण विभाग मंत्रालय मुंबई, वने व पर्यावरण मंत्रालय, सिव्हील लाईन नागपूर, प्रादेशिक कार्यालय नाशिक, उप- प्रादेशिक कार्यालय, धुळे, जिल्हाधिकारी कार्यालय धुळे, जिल्हापरिषद धुळे, जिल्हा उद्योग केंद्र धुळे, उपविभागीय अधिकारी कार्यालय शिरपुर, तहसिल कार्यालय शिंदखेडा, नगरपंचायत शिंदखेडा, ग्रामपंचायत कार्यालय, नरडाणा, जातोडे, वारूड, मलाणे, वाघोदे या ठिकाणी सर्व दस्तावेज अभ्यासण्यासाठी ठेवण्यात आले होते. या जाहीर सुचनेनंतर या प्रकल्पासंदर्भात ज्यांना काही सुचना दयावयाच्याअसतील यामंध्ये मी परत आपल्या निदर्शनास आणु इच्छिते की ही समीती लोकांचे प्रकल्पाबाबत पर्यावरण विषयक दृष्टीकोनातुन मत नोंदविण्यासाठी असुन कोणतीही निर्णय अथवा शिफारस करण्यासाठी नाही. सदर लोक सुनावणीचा अहवाल तयार करून पर्यावरण मंत्रालय मुंबई यांना सादर करावयाचा असुन त्यांनतर पर्यावरण मंत्रालय मुंबई हे या बाबत योग्य तो निर्णय घेणार आहेत.

तसेच सदर पर्यावरण लोकसुनावणीच्या संयोजक सौ. सौजन्या सु. पाटील, उप-प्रादेशिक अधिकारी, धुळे यांनी व्हिडीओ कॉन्फर्सिंग व्दारे नमुद केले की, सदर प्रस्तावीत प्रकल्पाबाबत या कार्यालयाकडे १५ लेखी अर्ज व ११ दृक-श्राव्य संदेश प्राप्त झालेले आहेत.

मा. आमदार श्री. जयकुमारजी रावल साहेब यांचे लेखी निवेदन प्राप्त झाले आहे ज्या मध्ये खालील मुदयांचा समावेश आहे.

१. जन सुनावणी ही प्रकल्प स्थळी घेणे बंधनकारक आहे.
२. प्रस्तावीत प्रकल्पातून निर्माण होणा-या ध्वनी प्रदुषणास कसे नियंत्रीत केले जाईल ?
३. प्रकल्पासाठी ज्यांची जमीन अधिग्रहीत केली आहे त्यांच्या बाबत काय नियोजन आहे ?
४. प्रकल्पामध्ये किती स्थानीकांना रोजगार मिळेल ?
५. रस्ते / वाहतूक सुरक्षेकरीता काय उपाययोजना आहेत ?

उप-प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि. मंडळ, धुळे यांनी मा. आमदार यांना दि. १६/१०/२०२० रोजीच्या पत्रान्वये जाहिर लोकसुनावणी ही केंद्रीय पर्यावरण मंत्रालयाच्या दि. १४/०९/२०२० च्या परिपत्रकान्वये सदर जाहिर लोकसुनावणी ही प्रत्यक्ष कारखाना स्थळावर तसेच ऑनलाईन पध्दतीने व्हिडियो कॉन्फरन्सिंगव्दारे (झूम अॅप) जिल्हाधिकारी कार्यालय, धुळे येथून घेण्यात येत असल्याबाबतचे मा. आमदार महोदयांना कळविले आहे.

प्रकल्पधारक यांनी मा. आमदार महोदयांनी उपस्थित केलेल्या उपरोक्त मुद्यांबाबत जनसुनावणीदरम्याण खालील प्रमाणे माहिती दिली.

१. प्रस्तावीत प्रकल्पातून निर्माण होणा-या ध्वनी प्रदुषणास कसे नियंत्रीत केले जाईल ?
प्रस्तावीत प्रकल्प हा क्लिंकर ग्राइंडिग प्रकल्प असून प्रकल्पामध्ये कच्च्या मालावर केवळ ग्राइंडिग व मिक्सींग ची प्रक्रीया करून त्याची पॅकिंग करण्यात येणार आहे. संपूर्ण प्रक्रिया यंत्रणा ही बंदीस्त स्वरूपात असणार आहे. कच्चा माल क्लिंकर व फ्लाय अॅश ची साठवणूक बंदीस्त आरसीसी सायलो मध्ये असणार आहे. जिप्सम व स्लॅग यांची साठवणूक शेड मध्ये केली जाईल. फ्लाय अॅश ची वाहतूक बंदीस्त बल्कर्स व्दारे केली जाईल व बंदीस्त यंत्रणेव्दारे सायलोमध्ये साठवली जाईल. सिमेंट ची साठवणूक बंदीस्त आरसीसी सायलो मध्ये असणार आहे व पॅकींग अत्याधुनिक इलेक्ट्रॉनीक पध्दतीने केली जानार आहे.
हवा प्रदुषण नियंत्राणासाठी योग्य क्षमतेचे बॅग फिल्टर व योग्य उंचीचे धुरांडे /चिमणी बसविण्यात येईल जेणे करून हवा प्रदुषणाची पातळी शासनाच्या विहीत मानांकानुसार असेल. कच्चा माल हाताळणी क्षेत्रामध्ये वेगवेगळया ट्रान्सफर पॉइंट च्या ठिकाणी १० ते १५ बॅक फिल्टर्स बसविण्यात येतील. सर्व कन्व्हेअर बेल्टस आच्छादीत असतील.

२. प्रकल्पासाठी ज्यांची जमीन अधिग्रहीत केली आहे त्यांच्या बाबत काय नियोजन आहे ?
प्रस्तावीत प्रकल्पाकरीता जमीनीचे अधिग्रहण करण्यात येणार नाही. एकूण २६.१० हे. इतकी जमीन म.औ.वि.म. तर्फे उद्योगास दि. २८/०९/२०२० व ३१/०३/२०१६ च्या पत्रान्वये देण्यात आली आहे. सदरील जागेसाठीचा करार ०८/१०/२०१८ रोजी करण्यात आला आहे. प्रस्तावीत प्रकल्पास महाराष्ट्र शासनातर्फे मेगा प्रोजेक्ट चा दर्जा दि. १०/०३/२०१५ रोजीच्या पत्रान्वये देण्यात आला आहे.

३. प्रकल्पामध्ये किती स्थानीकांना रोजगार मिळेल ?
प्रकल्प सुरू झाल्यानंतर जवळपास १२० स्थायी रोजगार व २०० ते २५० कंत्राटी पध्दतीने रोजगार उपलब्ध होण्याचे प्रस्तवीत आहे. स्थानीकांना शैक्षणिक पात्रता व अनुभव याच्या आधारावर रोजगाराकरीता प्राधान्य देण्यात येईल. प्रकल्पाचे बांधकाम सुरू असताना व प्रकल्प सुरू झाल्यानंतर मोठया प्रमाणात अप्रत्यक्षरित्या रोजगार निर्मीती होईल.

४. रस्ते / वाहतूक सुरक्षेकरीता काय उपाययोजना आहेत ?
प्रकल्पाकरीता होणा-या वाहतूकी दरम्यान क्षमतेपेक्षा जास्त माल वाहून नेण्यास बंदी असेल तसेच चालकांना वाहतूक सुरक्षितता नियमांबाबत वेळोवेळी प्रशिक्षण देण्यात येईल. वाहनांची नियमीत पणे देखभाल व प्रदुषण नियंत्रण तपासणी केली जाईल. ज्या वाहनांना फिटनेस प्रमाणपत्र व प्रदुषण नियंत्रण प्रमाणपत्र असेल अश्याच वाहनांना परवानगी दिली जाईल.

या नंतर सदर पर्यावरण विषयक जाहीर जनसुनावणीच्या संयोजक यांनी प्रकल्प प्रस्थाविकास विनंती केली की, सदर प्रस्तावीत प्रकल्पाबाबत जनतेस व समितीस सादरीकरण करून अवगत करण्यात यावेत. प्रकल्प प्रस्तावक यांचे प्रतिनीधी डॉ. व्ही. के. रेडडी, वरीष्ठ उपाध्यक्ष आणि कारपोरेट हेड-पर्यावरण युटीसीएल यांनी प्रकल्पाबाबतची प्रस्तावना सादर केली. त्यानंतर श्री. उमेश मिश्रा, (पर्यावरण समंत्रक) यांनी सदर प्रस्तावीत प्रकल्पाबाबतचे सादरीकरण केले. सदर सादरीकरणात त्यांनी प्रस्तावीत प्रकल्पाच्या १० कि.मी. परिघ क्षेत्रातील हवा, ध्वनी पातळी, जल गुणवत्ता, मातीची गुणवत्ता, सामाजिक व अर्थिक स्थिती या बाबात केलेल्या पर्यावरण विषयक अभ्यासाची माहिती नमुद केली. त्या बरोबरच सदर प्रस्तावीत प्रकल्पामुळे होणारा पर्यावरणीय आघात, प्रस्तावीत प्रदूषण नियंत्रण प्रणाली, पर्यावरण व्यवस्थापन आराखडा व सामाजिक- आर्थिक विकास आराखडा याबाबतची माहिती सादरीकरणावेळी दिली.

सौ. सौजन्या सु. पाटील, संयोजक तथा उप प्रादेशिक अधिकारी, म.प्र. नि.मंडळ, धुळे यांनी व्हिडियो कॉन्फरन्सिंगव्दारे सर्व उपस्थितांना आवाहन केले की, त्यांनी त्याचे पर्यावरण विषयक सुचना, आक्षेप, टिका-टिप्पणी पर्यावरण विषयक लोकसुनावाणी समिती समोर नमुद कराव्यात.

सदर पर्यावरण विषयक जाहिरसुनावणी दरम्यान खालील उपस्थितांनी आपले विचार/ टिका टिपणी, आक्षेप व्हिडियो कॉन्फरन्सिंगच्या माध्यमातुन मांडले.

| अ. क्र. | उपस्थितांचे नाव व उपस्थित केलेले विचार/ टिका टिपणी, आक्षेप. | प्रकल्प प्रस्तावकाकडून करण्यात आलेला खुलासा |
|---|---|---|
| १ | **सौ. संजीवणी शिसोदे, उपाध्यक्ष जि.प. धुळे –** सदर प्रकल्पाचे त्यांनी स्वागत केले. तसेच प्रदुषण नियंत्रण व परिसरातील पर्यावरण याची काळजी घेण्याचे त्यांनी नमुद केले. सदर उद्योगामुळे प्रदुषण होऊ शकते. तसेच सदर प्रस्तावीत उद्योगाने दिलेली आश्वासने पाळावीत. लोकांना स्थानीक पातळीवर सदर उद्योगाकडून रोजगार निर्मीतीच्या अपेक्षा असून सदर बाब प्रत्यक्षात उतरवीण्यात यावी. प्रकल्पाची उभारणी करतांना स्थानीक लोकांना रोजगार देण्यात यावा. तसेच प्रकल्प उभारणीच्या बांधकामासाठी लागनारी यंत्र सामग्री स्थानीक पातळीवर घेण्यात यावी. | **डॉ. के. व्ही. रेड्डी, प्रकल्प प्रस्तावकाचे प्रतिनीधी –** स्थानीक लोकांना त्यांच्या शैक्षणीक आर्हता व अनुभवानुसार रोजगार उपलब्ध करून देण्याबाबत प्राधान्य देण्यात येईल. सदर प्रकल्प स्थानीक व गावक-यांच्या सहका-याने कार्यरत राहील. शासनाच्या विहीत नियमानुसार रोजगार व प्रदुषण नियंत्रण केले जाईल. |
| २ | **डॉ. प्रमोद सिसोदे, नरडाणा –** त्यांनी सदर प्रकल्पाचे स्वागत करून नमुद केले की, परिसरातील जनता मोठा प्रकल्प विभागात येण्याबाबत प्रतिक्षेत होती. उद्योग उभारणी वेळी सुरवातीला दिलेली आश्वासने भविष्यात पुर्ण करण्यात यावी. रोजगार संख्या, प्रदुषण नियंत्रण व्यवस्था आणि इतर बाबी प्रकल्प अहवालानुसारच पुर्ण करण्यात याव्यात. स्थानिकांना साधारनपणे प्रकल्पात अस्थाही रोजगार न देता स्थायी स्वरूपातील रोजगार देण्यात यावेत. पर्यावरण विषयक जन सुनावणीत दिलेले सर्व आश्वासने प्रत्यक्षात करण्यात यावीत. या पुर्वी आम्ही उद्योगाबाबत दिलेल्या तक्रारीचे निवारण करण्यात आलेले नाही. | **डॉ. के. व्ही. रेड्डी, प्रकल्प प्रस्तावकाचे प्रतिनीधी –** या आगोदर नमुद करण्यात आलेले आहे की, स्थानीक लोकांना त्यांच्या शैक्षणीक आर्हता व अनुभवानुसार रोजगार उपलब्ध करून देण्याबाबत प्राधान्य देण्यात येईल. शासनाच्या विहीत नियमानुसार रोजगार उपलब्ध करून देण्यात येतील. तसेच प्रकल्प चालू झाल्यानंतर १५० ते २०० अस्थायी स्वरूपातील रोजगार उपलब्ध होण्याचे प्रस्तावीत आहे. प्रकल्प उभारणीच्या बांधकामावेळी जवळपास २००० कामगाराची आवश्यकता राहील. हवा प्रदुषण नियंत्राणासाठी योग्य क्षमतेचे बॅग फिल्टर व योग्य उंचीचे धुरांडे /चिमणी बसविण्यात येईल जेणे करून हवा प्रदुषणाची पातळी शासनाच्या विहीत मानांकानुसार असेल. कच्चा माल जसे की, क्लिंकर व फलाय ॲश व सिमेंट यांची साठवणूक इंटरलॉक प्रणालीच्या बंद साठवण टाक्या /सायलो करण्यात येईल. तसेच सदर मालाची हाताळणी व वाहतूक करतांनाच्या प्रक्रियेत धुळीचे उत्सर्जन होण्यास प्रतिबंद केला जाईल.<br><br>सदर प्रकल्पासून कोणतेही औद्योगिक सांडपाणी निर्माण होत नाही. फक्त घरगुती सांडपाणी निर्माण होते. जे योग्य ती प्रक्रिया करून बाग बगिचासाठी उद्योगाच्या परिसरात वापरण्यात येईल.सदर प्रकल्प शुन्य जल निष्कासन प्रकल्प आहे. |

| | | |
|---|---|---|
| ३ | **श्री. बबन भामरे पाटील -**<br>उद्योगांमुळे होणा-या ध्वनी व हवा प्रदुषणामुळे गावक-यांच्या आरोग्यावर परिणाम होऊ शकतो. सदर घातक परिणामांची माहिती प्रकल्प अहवालात नमुद करण्यात आलेली नाही. सदर पर्यावरण विषयक जन सुनावणीत उपस्थित केलेल्या सर्व मुद्यांची पुर्तता झाल्यास सदर प्रकल्पाचे स्वागत करण्यात येईल. | **डॉ. के. व्ही. रेड्डी, प्रकल्प प्रस्तावकाचे प्रतिनीधी –**<br>योग्य क्षमतेची हवा प्रदुषण नियंत्रण प्रणाली बसविण्याचे प्रस्तावीत आहे.<br>तसेच योग्य क्षमतेचे बॅग फिल्टर व योग्य उंचीचे धुरांडे /चिमणी बसविण्यात येईल जेणे करून हवा प्रदुषणाची पातळी शासनाच्या विहीत मानांकानुसार असेल.<br>तसेच सदर प्रस्तावीत प्रकल्पामुळे कोणतेही ध्वनी प्रदुषण होणार नाही व उद्योगाकडून नियमीतपणे परिसरातील वातावरणीय हवा व ध्वनी यांची पातळी नियमीत पणे तपासली जाईल. तसेच गरज पडल्यास आजू-बाजूच्या गावांमध्ये सुध्दा सदरील तपासणी केली जाईल.<br>शासकिय नियमांप्रमाणे उपलब्ध होणा-या रोजगारांपैकी ५० टक्के पेक्षा अधिक रोजगार हे स्थानीकांना त्यांच्या शैक्षणीक पात्रता / अनुभव विचारात घेऊन दिले जातील. |
| ४ | **श्री. गोवींदा पुंजू वाघ (सरपंच वाघोदे) –**<br>ब-याच वर्षापूर्वी औद्योगिक प्रयोजनाकरीता जमीनीचे अधिग्रहण करण्यात आले आहे. परंतू उद्योग सुरू झाला नाही. प्रशासनाने किमान गुरांना चरण्यासाठी जागा उपलब्ध करून दयावी. उद्योग सुरू झाले पाहीजेत. | **डॉ. के. व्ही. रेड्डी, प्रकल्प प्रस्तावकाचे प्रतिनीधी –**<br>परिसरातील सर्व गावक-यांना व प्रशासनाला सोबत घेवूनच प्रकल्प कार्यान्वीत केला जाईल. आपण सर्व मिळून परिसरातील विकासास हातभार लावू.<br>स्थानीक लोकांना त्यांच्या शैक्षणीक अहर्ता व अनुभवानुसार रोजगाराकरीता प्राधान्य देण्यात येईल.<br>प्रकल्पाकरीता कोणत्याही खाजगी जागेचे अधिग्रहण करण्यात आलेले नसून संपूर्ण जागा म.औ.वि.मं. तर्फे देण्यात आलेली आहे. |
| ५ | **श्री. लीलाधर सोनार, अध्यक्ष खान्देश आघाडी –**<br>यांनी जन सुनावणी दरम्यान त्यांचे लेखी निवेदन दिले.<br>१. प्रकल्पधारकातर्फे हवा व जल प्रदुषणाबाबतच्या सर्व नियमांचे पालन केल्यानंतरच उत्पादन सुरू करण्यात यावे.<br>२. उद्योगातर्फे जमीनीचे अधिग्रहण करण्यात आले आहे. त्यामुळे ज्यांची जमीन गेली त्यांना रोजगार दिला जावा.<br>३. रोजगारामध्ये कुशल कामगारांपैकी ७० टक्के व अकुशल कामगारापैकी ९० टक्के रोजगार स्थानीकाना दिला जावा.<br>४. उद्योगाला होणा-या एकूण नफ्या पैकी १० टक्के नफा हा आरोग्य व शैक्षणिक कामाकरीता देण्यात यावा.<br>५. शासनाने उद्योगास कोणत्या निकषांवर परवानगी दिली?<br>६. नरडाणा एमआयडीसी मध्ये केवळ सिमेंट | **डॉ. के. व्ही. रेड्डी, प्रकल्प प्रस्तावकाचे प्रतिनीधी –**<br>आजू-बाजूंच्या गावांमध्ये आरोग्य विषयक कामांकरीता प्रकल्पाच्या सामाजिक उत्तरदायित्व (Corporate Social Responsibility) अंतर्गत निधी उपलब्ध करून दिला जाईल. सदरील कामे ही गावकरी व प्रशासन यांना विश्वासात घेवूंन केली जातील. तसेच या करीता एक समिती बनविण्यात येईल.<br>या आधी सांगितल्याप्रमाणे, स्थानिकांना रोजगाराकरीता प्राधान्य देण्यात येईल व आवश्यकता भासल्यास तरूणांना प्रशिक्षण दिले जाईल.<br>पर्यावरण मंत्रालय, महाराष्ट्र शासन यांच्या तर्फे प्रस्तावीत प्रकल्पास Terms of Reference देण्यात आला असून त्या अनुषंगाने प्रकल्पातर्फे मसुदा प्रकल्प अहवाल व पर्यावरण व्यवस्थापन योजना बनविण्यात आली आहे तसेच ही जनसुनावणी घेतली जात आहे. अंतिम प्रकल्प अहवाल सादर केल्यानंतर मंत्रालयातर्फे आम्हास हवा,जल व ध्वनी प्रदुषण नियंत्रणाकरीता अटी व शर्ती |

| | | |
|---|---|---|
| | उद्योगांनाच परवानगी का दिली जाते?<br>७. सिमेंट उद्योगाकरीता जमीन देतांना कोणते निकष लावले जातात? सिमेंट उद्योग सदरील निकषाचे पालन करतात का?<br>८. परिसरातील सुशिक्षीत बेरोजगारांना प्रकल्पात रोजगार देण्यात यावा.<br>९. कापूस / अन्न प्रक्रिया उद्योग किंवा ऑटोमोबाईल उद्योगांची गरज येथील परिसरात असून या दृष्टीने प्रयत्न करणे आवश्यक आहे.<br>१०. साधारण पणे राजकीय पुढारी व त्यांच्या जवळच्या लोकांना उद्योगांमुळे निर्माण होणा-या रोजगाराचा व ईतर बाबींचा फायदा होतो. प्रस्तावीत प्रकल्पाबाबत सुध्दा असे होऊ नये.<br>११. स्थानीकांना देण्यात येणारा रोजगार हा तात्पूरता नसावा व तो कायमस्वरूपी असावा.<br>१२. उपरोक्त मुद्यांवर उद्योगातर्फे करण्यात येत असलेल्या कार्यवाही बाबत देखरेख करण्यासाठी एक समिती बनविण्यात यावी. | सहीत पर्यावरणीय मंजुरी दिली जावू शकते. प्रकल्पातर्फे सर्व अटीचे पालन करण्यात येईल. |
| ६ | **श्री. महेंद्र सिसोदीया –**<br>सदरील जनसुनावणी ही नियमबाहय असून जनसुनावणी प्रकल्पाच्या ठिकाणीच घेतली जावी व शासकिय अधिकारी त्या ठिकाणी उपस्थित असावेत.<br>सध्या सुरू असलेल्या उद्योगांनी त्यांची आश्वासने पाळली नाहीत व त्यामुळे नागरीकांना प्रदुषणाच्या व त्यामुळे आरोग्यावर होत असलेल्या परिणामांच्या समस्या भेडसावत आहेत. हे प्रश्न आधी सोडविले गेले पाहीजेत व त्यानंतर नवीन उद्योग सुरू केले पाहीजेत.<br>शेतक-यांना त्यांच्या जमीनींचा मोबदला दिला जावा व सुशिक्षीत तरुणांना प्रकल्पात रोजगार दिला जावा. | **सौ. सौजन्या सु. पाटील, उप-प्रादेशिक अधिकारी –**<br>सदरील जन सुनावणी ही सन २००६ व २००९ तसेच १४/०९/२०२० रोजीच्या शासनाच्या परिपत्रकास अनुसरूनच घेतली जात आहे. जन सुनावणीची जाहिर सुचना मराठी व इंग्लीश वर्तमानपत्रांमध्ये प्रकाशित करण्यात आली होती. कोवीड- १९ च्या प्रादुर्भावामुळे जन सुनावणी ऑनलाईन पध्दतीने घेण्यात येत आहे व उपलब्ध असलेले सर्व सर्वोत्तम पर्याय - जसे की मोबाईल फोनव्दारे किंवा प्रत्यक्ष प्रकल्पस्थळी उपस्थित राहून - नागरीकांना जनसुनावणीमध्ये सहभागी होण्यासाठी उपलब्ध करून देण्यात आले आहेत.<br>**डॉ. के. व्ही. रेड्डी, प्रकल्प प्रस्तावकाचे प्रतिनीधी –**<br>कोवीड- १९ च्या प्रादुर्भाव टाळण्यासाठी केंद्र व राज्य शासनातर्फे बरेचसे नियम बनविण्यात आले आहेत. ज्यामुळे जनसुनावणी ही अशा प्रकारे घेण्यात येत आहे. |
| ७ | **श्री. महेंद्र शेखर माळी –**<br>आमचे गाव प्रकल्पा पासून पुर्वेकडे २ कि.मी. अंतरावर असून वारा हा पश्चिमेकडून पुर्वेकडे वाहतो. यामुळे उद्योगातून निघनारी धुळ आमच्या गावामध्ये येण्याची व त्यामुळे आरोग्यावर व पिकांवर विपरीत परिणाम होण्याची शक्यता आहे.<br>हे टाळण्यासाठी उद्योग सुरू होण्याआधिच आजू-बाजूच्या गावांमध्ये वृक्षा रोपण करण्यात यावे. | **डॉ. के. व्ही. रेड्डी, प्रकल्प प्रस्तावकाचे प्रतिनीधी –**<br>वा-याची दिशा ही दर ३ महिन्यामध्ये बदलते व उद्योगातून होणा-या प्रदूषण नियंत्रणाकरीता पुरेशा क्षमतेचे बॅग फिल्टर्स व चिमणी बसविण्यात येईल. जेणे करून प्रदूषणाची पातळी विहीत मर्यादेत राहील. |

| | | |
|---|---|---|
| | आमच्या गावाचा समावेश उद्योगांच्या कमांड एरीया मध्ये करण्यात यावा. | |
| ८ | **श्री. सुरेश माळी, वाघोदे –**<br>मी एक शेतकरी आहे. शेतक-यांनी कितीही विरोध केला तरी सुध्दा प्रकल्प सुरू केला जाईल. प्रकल्पाच्या आजू-बाजूच्या परिसरात बरेच असे शेतकरी आहेत. प्रकल्पामुळे त्यांचा फायदा व्हावा. रोजगाराकरीता स्थानिकांना प्राधान्य देण्यात यावे. उद्योगाच्या व्यवस्थापकांनी सर्व शेतक-यांशी संपर्क ठेवावा. | **डॉ. के. व्ही. रेड्डी, प्रकल्प प्रस्तावकाचे प्रतिनीधी –**<br>प्रकल्पाकरीता कोणत्याही खाजगी जागेचे अधिग्रहण करण्यात आलेले नसून संपूर्ण जागा म.औ.वि.मं. तर्फे देण्यात आलेली आहे. प्रकल्पाकरीता सर्व शासकीय नियमांचे पालन करण्यात येईल. |
| ९ | **श्री. मिलींद भावसार, सरपंच अजंदे बु.-**<br>सध्या सुरू असलेल्या उद्योगांमुळे मोठया प्रमाणात हवेचे प्रदुषण होत असून आम्ही या बाबत तक्रार केल्यास उद्योगातर्फे आमच्यावर पोलिस केस करण्यात आली. हवा प्रदूषणामुळे शेतक-यांना ब-याच समस्यांचा सामना करावा लागत असून प्रस्तावीत प्रकल्पामुळे यात भर पडू नये. मागील ३ वर्षात एकदाही उद्योगांतर्फे आरोग्य शिबीर घेण्यात आले नाही. | **डॉ. के. व्ही. रेड्डी, प्रकल्प प्रस्तावकाचे प्रतिनीधी –**<br>स्थानीक लोकांना त्यांच्या शैक्षणीक अहर्ता व अनुभवानुसार रोजगाराकरीता प्राधान्य देण्यात येईल. प्रकल्पाकरीता कोणत्याही खाजगी जागेचे अधिग्रहण करण्यात आलेले नसून संपूर्ण जागा म.औ.वि.मं. तर्फे देण्यात आलेली आहे.<br>योग्य क्षमतेचे बॅग फिल्टर व योग्य उंचीचे धुरांडे /चिमणी बसविण्यात येईल जेणे करून हवा प्रदुषणाची पातळी शासनाच्या विहीत मानकांनुसार असेल. |
| १० | **श्री. सचिन सोनवणे, धुळे दक्ष नागरीक मंच –**<br>प्रकल्प अहवालामध्ये ब-याचशा चुका आहेत. प्रकल्प स्थळापासून १० कि.मी. पर्यंत कोणताही उद्योग नाही असे नमुद केले आहे. तथापी प्रकल्पस्थळापासून जवळ बरेचसे उद्योग असून प्रकल्प स्थळाच्या समोरच एक सिमेंट उद्योग सुरू आहे.<br>नमुद केलेली लोकसंख्या सुध्दा चुकीची आहे.<br>पाण्याच्या स्त्रोताबद्दल माहिती दिलेली नसुन भुजलाचा वापर करण्यात येईल असे नमुद केले आहे. असे झाल्यास परिसरातील भुजलाची पातळी खालावेल व शेतक-यांना शेतीसाठी पाणी राहणार नाही.<br>प्रस्तावीत ध्वनीची पातळी ६५ डेसीबल इतकी असे नमुद केले आहे. तथापी शासकीय मानकांनुसार ४५ डेसीबल ही निवासी क्षेत्रा करीता विहीत मर्यादा आहे.<br>अशा हवा प्रदूषणकारी उद्योगांपेक्षा अन्न प्रक्रिया उद्योग व ऑटोमोबाईल उद्योग यांची या परिसरात गरज आहे. | **डॉ. के. व्ही. रेड्डी, प्रकल्प प्रस्तावकाचे प्रतिनीधी –**<br>उद्योगामध्ये आवश्यक ती प्रदूषण नियंत्रण यंत्रणा बसविण्यात येईल. योग्य क्षमतेचे बॅग फिल्टर व योग्य उंचीचे धुरांडे /चिमणी बसविण्यात येईल जेणे करून हवा प्रदुषणाची पातळी शासनाच्या विहीत मानकांनुसार असेल.<br>प्रदुषणाची पातळी मोजण्याकरीता स्वयंचलीत ऑनलाईन यंत्रणा बसविण्यात येईल ज्या व्दारे प्रदुषणाची पातळी नेहमी मोजण्यात येईल व उद्योगाच्या प्रवेश व्दाराजवळ दर्शवीली जाईल. तसेच केंद्रीय व राज्य प्रदुषण नियंत्रण मंडळ यांच्या यंत्रणेशी जोडलेली असेल.<br>उद्योगाकडून नियमीतपणे परिसरातील वातावरणीय हवा व ध्वनी यांची पातळी नियमीत पणे तपासली जाईल. तसेच गरज पडल्यास आजू-बाजूच्या गावांमध्ये सुध्दा सदरील तपासणी केली जाईल.<br>पाण्याचा पुरवठा हा म.औ.वि.मं. तर्फे केला जाईल. गरज भासल्यास केंद्रीय भुजल आयोग यांची परवानगी घेवूनच भुजलाचा वापर केला जाईल.<br>प्रकल्पाचा पर्यावरणीय अहवाल केंद्रीय पर्यावरण, वने व वातावरणीय बदल मंत्रालय यांची मान्यता असलेल्या तज्ञ संस्थेकडून तयार करण्यात आला आहे. |
| ११ | **श्री. पंकज कदम, जिल्हा परिषद सदस्य –**<br>रोजगाराकरीता स्थानिकांना प्राधान्य देण्यात यावे | **डॉ. के. व्ही. रेड्डी, प्रकल्प प्रस्तावकाचे प्रतिनीधी –**<br>आपल्या सुचनेबद्दल आभार व स्थानिक प्रतिनिधींनी |

| | | |
|---|---|---|
| | तसेच उद्योगाच्या अधिका-यांनी गावक-यांना विश्वासात घेवून काम केले पाहीजे. परिसरात काही लोक दिशाभूल करणारे असून ते प्रकल्पाच्या अधिका-यांना फसवू शकतात. | दिलेल्या पाठींब्या बद्दल सर्वांचे आभार. |
| १२ | **श्री. भिमराव दाणवे –**<br>परिसरामध्ये कापूस व इतर पिकांचे मोठया प्रमाणात उत्पादन होत असून कापूस/अन्न प्रकिया उद्योग किंवा ऑटोमोबाईल उद्योग सुरू व्हावेत. परिसराचा इतर मोठया शहरांप्रमाणे आर्थिक विकास होण्याकरीता उद्योग आवश्यक आहेत. तथापी सर्व प्रकारची प्रदुषण नियंत्रण यंत्रणा बसविणे व नियमीतपणे वापरणे तितकेच आवश्यक आहे. उद्योगांमुळे रोजगार निर्मीती होईल व येथील लोकांना बाहेर जाण्याची गरज राहणार नाही. | **डॉ. के. व्ही. रेड्डी, प्रकल्प प्रस्तावकाचे प्रतिनीधी –**<br>उद्योगामध्ये आवश्यक ती प्रदूषण नियंत्रण यंत्रणा बसविण्यात येईल. योग्य क्षमतेचे बॅग फिल्टर व योग्य उंचीचे धुरांडे /चिमणी बसविण्यात येईल जेणे करून हवा प्रदुषणाची पातळी शासनाच्या विहीत मानकांनुसार असेल.<br>प्रदुषणाची पातळी मोजण्याकरीता स्वयंचलीत ऑनलाईन यंत्रणा बसविण्यात येईल ज्या व्दारे प्रदुषणाची पातळी नेहमी मोजण्यात येईल व उद्योगाच्या प्रवेश व्दाराजवळ दर्शवीली जाईल. तसेच केंद्रीय व राज्य प्रदुषण नियंत्रण मंडळ यांच्या यंत्रणेशी जोडलेली असेल.<br>उद्योगामुळे ध्वनी प्रदुषण होणार नाही याची काळजी घेतली जाईल. उद्योगाकडून नियमीतपणे परिसरातील वातावरणीय हवा व ध्वनी यांची पातळी नियमीत पणे तपासली जाईल. तसेच गरज पडल्यास आजू-बाजूच्या गावांमध्ये सुध्दा सदरील तपासणी केली जाईल.<br>सिमेंट उद्योगामध्ये कोणत्याही प्रकारचे रासायनिक पदार्थ वापरले जात नसून कच्चा माल पुर्णपणे नैसर्गिक असतात. |
| १३ | **श्री. संजय यादव, जिल्हादंडाधिकारी, धुळे –**<br>उपस्थित नागरीकांनी प्रस्तावित प्रकल्पाबाबत आपली मते मांडावीत. सध्या सुरू असलेल्या इतर उद्योगांबद्दल काही तक्रार असेल तर ते वेगळया प्रकारे आपण हाताळू.<br>प्रकल्पाच्या अधिका-यांनी जनसुनावणी दरम्यान चर्चिल्या गेलेल्या व मान्य केलेल्या सर्व मुद्यांबाबत पुर्तता करावी. जिल्हा प्रशासन सुध्दा प्रकल्पाशी संबंधीत कामाची देखरेख करेल. | -- |
| १४ | **श्री. जाधव –**<br>सध्या सुरू असलेल्या उद्योगांमुळे मोठया प्रमाणात हवेचे प्रदुषण होत असून त्यामुळे पिकांवर व आरोग्यावर विपरीत परिणाम होत आहे.<br>याबाबत उद्योगामध्ये तक्रार दिली आहे. तरीही उद्योगातर्फे कसलीही कार्यवाही करण्यात आली नाही.<br>प्रस्तावीत प्रकल्पाच्या अधिका-यांनी जन सुनावणी दरम्यान दिलेली आश्वासने पाळावीत. | **डॉ. के. व्ही. रेड्डी, प्रकल्प प्रस्तावकाचे प्रतिनीधी –**<br>जन सुनावणी दरम्यान दिलेली आश्वासने नक्कीच पाळली जातील. प्रदुषण नियंत्रणाकरीता आवश्यक ती सर्व यंत्रणा बसवीली जाईल. |

| | | |
|---|---|---|
| १५ | **श्री. विजय प्रताप बोरसे –**<br>सध्या सुरू असलेल्या सिमेंट उद्योगातर्फे देण्यात आलेल्या आश्वासनांची पुर्तता करण्यात आली नाही. प्रस्तावीत प्रकल्पाबाबत सुध्दा असे होऊ नये अशी लोकांची अपेक्षा आहे. स्थानीकांना रोजगार देण्यात यावा. | **डॉ. के. व्ही. रेड्डी, प्रकल्प प्रस्तावकाचे प्रतिनीधी –**<br>या आधी सांगितल्या प्रमाणे स्थानीक लोकांना त्यांच्या शैक्षणीक अहर्ता व अनुभवानुसार रोजगाराकरीता प्राधान्य देण्यात येईल. |
| १६ | **श्री. सरदार पटेल, सरपंच जातोडा –**<br>रोजगाराकरीता स्थानिकांना प्राधान्य देण्यात यावे. सध्या सुरू असलेल्या सिमेंट उद्योगातर्फे देण्यात आलेल्या आश्वासनांची पुर्तता करण्यात आली नाही. प्रस्तावीत प्रकल्पाबाबत सुध्दा असे होऊ नये अशी लोकांची अपेक्षा आहे. | **डॉ. के. व्ही. रेड्डी, प्रकल्प प्रस्तावकाचे प्रतिनीधी –**<br>स्थानीक लोकांना त्यांच्या शैक्षणीक अहर्ता व अनुभवानुसार रोजगाराकरीता प्राधान्य देण्यात येईल.<br>उद्योगामध्ये आवश्यक ती प्रदूषण नियंत्रण यंत्रणा बसविण्यात येईल. योग्य क्षमतेचे बॅग फिल्टर व योग्य उंचीचे धुरांडे /चिमणी बसविण्यात येईल जेणे करून हवा प्रदुषणाची पातळी शासनाच्या विहीत मानकांनुसार असेल. |
| १७ | **श्रीमती अनिता बैसाणे, अध्यक्ष महिला आघाडी, खान्देश हित संग्राम –**<br>प्रस्तावीत प्रकल्पामुळे स्थानीकांना रोजगार उपलब्ध व्हावा. जर स्थानीकांमध्ये अपेक्षीत शैक्षणीक पात्रता/ अनुभव असलेले उमेदवार नसतील तर त्यांना प्रशिक्षण देण्यात यावे. कारण या परिसरातील सर्व लोक उच्चशिक्षीत नाहीत.<br>प्रकल्प अधिका-यांतर्फे सामाजिक कार्य, क्रीडा, महिला सबलीकरण ईत्यादी बाबत कार्य करण्यात यावे. जन सुनावणी दरम्यान दिलेल्या आश्वासनाची पुर्तता करणे सर्वात आवश्यक आहे. | **डॉ. के. व्ही. रेड्डी, प्रकल्प प्रस्तावकाचे प्रतिनीधी –**<br>या आधी सांगितल्या प्रमाणे स्थानीक लोकांना त्यांच्या शैक्षणीक अहर्ता व अनुभवानुसार रोजगाराकरीता प्राधान्य देण्यात येईल. तथापी उद्योगात काही रोजगार असे आहेत ज्या करीता उच्च शिक्षीत व्यक्तीची गरज नसते. जसे की पॅकींग युनीट मध्ये, अशा सर्व ठिकाणी स्थानिकांना रोजगार देण्यात येईल.<br>महिलांचे बचत गट तयार करून त्यांना शिलाई करणे, पापड, अगरबत्ती बनवीणे अशी कामे देण्यात येतील. |
| १८ | **श्री. कामराज निकम –**<br>मा. आमदार श्री. जय कुमार रावल, यांनी सदरील जनसुनावणी प्रकल्प स्थळी घेण्याबाबत निवेदन दिले आहे. सदरील निवेदनामध्ये पुढील मुद्यांचा समावेश आहे.<br>प्रस्तावीत उद्योगामुळे होणारे प्रदूषण, रोजगाराकरीता स्थानीकांना प्राधान्य, रोजगाराकरीता तरुणांना प्रशिक्षण देण्यात यावे.<br>सुरू असलेल्या उद्योगाच्या वाहतूकीमुळे रस्त्यांची दुर्दशा झालेली आहे. या मुद्यांबाबत उद्योगाच्या अधिका-यांनी योग्य ती दक्षता घ्यावी. | **डॉ. के. व्ही. रेड्डी, प्रकल्प प्रस्तावकाचे प्रतिनीधी –**<br>मा. आमदार श्री. जय कुमार रावल, यांच्या मार्गदर्शनाबद्दल आभार.<br>उद्योगामुळे प्रदुषण होणार नाही याची पुरेपूर काळजी घेतली जाईल. क्लिंकर, सिमेंट व फ्लाय ॲश चा साठा बंद सायलो (Silo) मध्ये केला जाईल व त्यांची हाताळणी ही बंदीस्त यंत्रणेव्दारे करण्यात येईल. जेणेकरून त्यांचे उत्सर्जन होणार नाही.<br>उद्योगामध्ये आवश्यक ती प्रदूषण नियंत्रण यंत्रणा बसविण्यात येईल. योग्य क्षमतेचे बॅग फिल्टर व योग्य उंचीचे धुरांडे /चिमणी बसविण्यात येईल जेणे करून हवा प्रदुषणाची पातळी शासनाच्या विहीत मानकांनुसार असेल.<br>प्रदुषणाची पातळी मोजण्याकरीता स्वयंचलीत ऑनलाईन यंत्रणा बसविण्यात येईल ज्या व्दारे प्रदुषणाची पातळी नेहमी मोजण्यात येईल व उद्योगाच्या प्रवेश |

| | | |
|---|---|---|
| | | व्दाराजवळ दर्शवीली जाईल. तसेच केंद्रीय व राज्य प्रदुषण नियंत्रण मंडळ यांच्या यंत्रणेशी जोडलेली असेल. |
| १९ | **श्री. तुषार रंधे, अध्यक्ष जि.प. धुळे –**<br>प्रस्तावीत प्रकल्पाचे स्वागत आहे. सध्या सुरू असलेल्या उद्योगांबाबत जनतेचा अनुभव सुखावह नाही. प्रस्तावीत प्रकल्पामुळे वायु प्रदूषणात वाढ होऊ शकते. तथापी उद्योग लवकरात लवकर सुरू व्हावा. | **डॉ. के. व्ही. रेड्डी, प्रकल्प प्रस्तावकाचे प्रतिनीधी –**<br>उद्योगामुळे होणा-या प्रदूषण नियंत्रणा करीता रू. २५ कोटी इतक्या निधीची तरतुद करण्यात आली आहे. उद्योगामध्ये आवश्यक ती प्रदूषण नियंत्रण यंत्रणा बसविण्यात येईल. योग्य क्षमतेचे बॅग फिल्टर व योग्य उंचीचे धुरांडे /चिमणी बसविण्यात येईल जेणे करून हवा प्रदुषणाची पातळी शासनाच्या विहीत मानकांनुसार असेल.<br>पर्यावरणीय मंजुरी (Enviromental Clearance) मधील अटींचा पुर्तता अहवाल संबंधीत विभागात सादर करण्यात येईल व तो मंत्रालयाच्या संकेतस्थळावर सुध्दा उपलब्ध केला जाईल. |
| २० | **ॲड. अरविंदकुमार मंदासे –**<br>प्रस्तावीत प्रकल्पामुळे हवा, पाणी व ध्वनी प्रदुषण होईल. उद्योगाच्या प्रतिनीधीनी याबाबत स्पष्टीकरण दयावे. सध्या सुरू असलेल्या उद्योगांनी सुध्दा प्रदूषण नियंत्रणा बाबत ऑश्वासन दिले होते. तथापी ते पुर्ण करण्यात ते अपयशी ठरले व त्याचे विपरीत परिणाम दिसून येत आहेत. त्यावेळेस सुध्दा नागरीकांनी या उद्योगांना विरोध केला होता. तरीही त्यांना परवानगी देण्यात आली.<br>प्रस्तावीत उद्योगामुळे आस-पासची गावे प्रभावीत होतील व या मुळेच गावक-यांचा प्रकल्पास विरोध आहे. प्रकल्पाकरीता परवानगी दिल्यास आम्ही तिव्र आंदोलन करू.<br>परिसरामध्ये कापूस व इतर पिकांचे मोठया प्रमाणात उत्पादन होत असून कापूस/अन्न प्रकिया उद्योग किंवा ऑटोमोबाईल उद्योग सुरू व्हावेत | **डॉ. के. व्ही. रेड्डी, प्रकल्प प्रस्तावकाचे प्रतिनीधी –**<br>सध्याच्या हवा,पाणी,माती यांच्या स्थितीबाबत तसेच प्रकल्पाच्या बांधकामादरम्यान असणा-या व प्रकल्प सुरू झाल्या नंतरच्या स्थितीबाबत अभ्यास केला गेला. अभ्यासाच्या निष्कर्षावरून हवा,पाणी,माती यांच्या स्थितीमध्ये उपेक्षणीय बदल होईल व त्याचे प्रमाण विहीत मर्यादेत असेल असे दिसून येते.<br>उद्योगाकडून नियमीतपणे परिसरातील वातावरणीय हवा व ध्वनी यांची पातळी नियमीत पणे तपासली जाईल. तसेच गरज पडल्यास आजू-बाजूच्या गावांमध्ये सुध्दा सदरील तपासणी केली जाईल. |

**श्री. अमर दुर्गुळे,** पर्यावरण विषयक जनसुनावणी समितीचे सदस्य तथा प्रभारी प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि. मंडळ, नाशिक यांनी सुनावणीदरम्यान व्हिडियो कॉन्फरन्सिंगव्दारे खालील सुचना दिल्या.

१. प्रकल्प प्रस्तावक यांनी कोल मिल बाबत नमुद केले असून, पर्यावरण आघात मुल्यांकनामध्ये याचा उददेश व प्रदुषण क्षमता व गरजा अतंर्भूत केलेल्या नसून अंतीम EIA अहवालामध्ये त्याचा समावेश करण्यात यावा.
२. प्रकल्पामध्ये हॉट एअर जनरेटर प्रस्तावीत असल्यास त्यामुळे होऊ शकणा-या प्रदुषणाबाबत माहिती अंतीम EIA अहवालामध्ये त्याचा समावेश करण्यात यावा.
३. प्रकल्प प्रस्तावक यांनी वृक्ष लागवडीसाठी ८.४ हे. म्हणजेच २० एकर जागा प्रस्तावीत केली असून त्यासाठी लागनारे पाणी ४०० सीएमडी म्हणजेच २० सीएमडी प्रति एकर असेल. वॉटर बजेट बद्दल व STP च्या प्रक्रियाकृत पाण्याच्या विल्हेवाटी बद्दल माहितीचा अंतीम EIA अहवालामध्ये समावेश करण्यात यावा.

४. सदर प्रस्तावीत प्रकल्पात कामगार क्षमता ३७० असून (१२० स्थायी व २५० अस्थायी) असून सांडपाणी उत्पादन ६५ सीमएडी आहे. वॉटर बजेट बद्दल माहितीचा अंतीम EIA अहवालामध्ये समावेश करण्यात यावा.

सदर बाबत उपस्थित केलेल्या वरील मुद्याबाबत प्रकल्प प्रस्तावकाचे प्रतिनीधी **डॉ. के.व्ही. रेड्डी** यांनी खालील माहिती व खुलासा नमुद केला.

१. हॉट एअर जनरेटरसाठी कोल मिल प्रस्तावीत असून त्याबाबतची प्रदुषण क्षमतेविषयक माहिती पर्यावरण मुल्यांकन आघात अहवालाच्या पाठ क्र. ४, पृष्ठ क्र. ८४ वर तक्ता क्र. ४.१ मध्ये नमुद करण्यात आलेली आहे.
२. कोल मिलच्या प्रदुषण क्षमतेविषयकची माहिती हवा प्रदुषण मॉडेलींग इनपुट डाटा पर्यावरण मुल्यांकन आघात अहवालाच्या पाठ क्र. ४ मध्ये अंतर्भूत केलेली आहे.
३. वृक्ष लागवड हरीतपटटयासाठी ८.६ हे. जागा राखीव असून प्रत्येक वर्षीचा हरीत पटटा विकसीत आराखडा पर्यावरण मुल्यांकन आघात अहवालाच्या पाठ क्र. १०, पृष्ठ क्र. १४४ वर नमुद केलेला आहे.
४. वॉटर बजेट विषयीची संपूर्ण माहिती पर्यावरण मुल्यांकन आघात अहवालाच्या पाठ क्र. २, पृष्ठ क्र. २२ वर नमुद करण्यात आलेली आहे.

जनसुनावणीच्या संयोजक **सौ. सौजन्या सु. पाटील** यांनी उपस्थितांपैकी कुणास मत मांडण्याचे आवाहन केले. तथापी कुणीही आपले मत मांडण्याकरीता पुढे आले नाही.

**जिल्हा दंडाधिकारी श्री. संजय यादव** यांनी उपस्थित नागरिकांनी मांडलेल्या सर्व मुद्यांची यथोचित नोंद घेण्यात आली असून त्यांचा समावेश जनसुनावणीच्या ईतिवृत्तामध्ये केला जाईल अशी माहिती दिली. प्रस्तावीत प्रकल्पाच्या अधिकाऱ्यांनी दिलेल्या सर्व आश्वासनांची पुर्तता करण्याबाबत व हवा, पाणी, व ध्वनी प्रदुषण नियंत्रण बाबत आवश्यक ती यंत्रणा बसविण्याबाबत सुचित केले. जिल्हा प्रशासनातर्फेसुध्दा प्रकल्पाच्या कामकाजावर देखरेख ठेवली जाईल असे त्यांनी सांगितले.

जनसुनावणीच्या संयोजक सौ. सौजन्या सु. पाटील, उप-प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि. मंडळ यांनी उपस्थित नागरिकांनी मांडलेल्या सर्व मुद्यांची यथोचित नोंद घेण्यात आली असून त्यांचा समावेश जनसुनावणीच्या ईतिवृत्तामध्ये केला जाईल अशी माहिती दिली. मा. अध्यक्षांच्या परवानगीने त्यांनी जनसुनावणी संपन्न झाल्याचे जाहीर केले.

| | | |
|---|---|---|
| **सौ. सौजन्या सु. पाटील** | **श्री. अमर दुर्गुळे** | **श्री. संजय यादव** |
| संयोजक, जनसुनावणी समिती तथा उप-प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि. मंडळ, धुळे | सदस्य, जनसुनावणी समिती तथा प्रादेशिक अधिकारी, म.प्र. नि.मंडळ, नाशिक | अध्यक्ष, जनसुनावणी समिती तथा जिल्हाधिकारी व जिल्हा दंडाधिकारी, धुळे |